CNRNO.MHAU09002348-2017
नि.दि.दा.क्र. १८९/२०१७
सिंधुबाई वि. कुंडलिक व इतर

# निशाणी क्र.२२ व नि.क्र.२५ वरील आदेश

सदर अर्ज हे वादी तर्फे प्रतिवादी नं.१ चे कायदेशीर वारस अभिलेखावर देण्यासाठी, विलंब माफ करणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी नं.१ हे दि.१०/१०/२०१८ रोजी मयत झाले आहेत. प्रतिवादी नं.१ हे मयत होउन जवळपास ३५ दिवसांचा विलंब झालेला आहे. सदरचा विलंब हा वादीकडून निष्काळजीपणाने अथवा कुठल्याही गैरहेतूने झालेला नाही. केवळ मयत प्रतिवादी नं.१ यांचे मृत्यु प्रमाणपत्र दि.१९/०१/२०१९ व वारस प्रमाणपत्र दि.२५/०१/२०१९ रोजी ग्रामपंचायत कार्यालयाकडून वेळेवर प्राप्त न झाल्यामुळे वारस अभिलेखावर घेण्यास विलंब झाला. प्रतिवादी नं.१ चे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. त्यानुसार दाव्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे. वादीने अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

२. वादी तर्फे प्रतिवादी नं.१ चा मृत्यु दाखला दाखल केला आहे. त्यावरुन प्रतिवादी नं.१ दि. १०/१०/२०१८ रोजी मयत झाल्याचे स्पष्ट होते. वादी तर्फे विलंब माफीसाठी पुरेसे कारण दिले आहे. सदरचा दावा जाहीर करुन मिळण्यासाठी व कब्जा मिळण्यासाठी दाखल केला आहे. त्यामुळे प्रतिवादी नं.१ चे कायदेशीर प्रतिनिधी विरुध्द दावा चालविण्याचा अधिकार टिकून राहतो. त्यामुळे प्रतिवादी नं.१ चे कायदेशीर प्रतिनिधींना अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. सबब, आदेश.

## आदेश

१. निशाणी क्र.२२ व नि.क्र.२५ वरील अर्ज मंजुर करण्यात येतात.

२. प्रतिवादी नं. १ चे कायदेशीर प्रतिनिधींना अभिलेखावर घेण्यास परवानगी देण्यात येते.

३. वादीने पुढील तारखेपावेतो दाव्यात आवश्यक ती दुरुस्ती करावी.

स्वाक्षरीत/-

दि.०२/०७/२०१९
पैठण

(सचिन ना. भावसार )
सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,
पैठण

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | *Rakesh Rajmadan Pedapalli* |
| Court | : | Jt.C.J.J.D. , Paithan. |
| Date of Judgment | : | 02/07/2019. |
| Judgment signed by the presiding officer on | : | 02/07/2019. |
| Judgment uploaded on | : | 02/07/2019. |